इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,११० इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेचो नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८१८२१३४१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास बिभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

शासन निर्णय क्र- नप्राशा-२००८/प्रक्र ६८८/प्राशि-3 दि १७/३/०९ 

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री.शिवाजी प्रसारक मंडळ, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे | जिजामाता इंग्लिश मिडीअम स्कूल, जेजुरी | इंग्रजी | १ ली |
| ४ | श्री.भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, आंबेगाव , पुणे | शिवाजीराव आढळराव पाटील प्रायमरी स्कूल, मंचर, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ५ | वाकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ पेठ | श्री.वाकेश्वर इंग्लिश मिडीअम स्कूल, पेठ | इंग्रजी | १ ली |
| ६ | कै.मुधकर राजेनिंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, एमआयडी.सी ऑफीसजवळ, बारामती, पुणे | संतसावतामाळी प्राथ. विद्या. डोर्लेवाडी, ता.बारामती. जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७ | विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, भिगवण रोड, ता.बारामती, जि.पुणे | विद्या प्रतिष्ठानचे सोमेश्वर इंग्लिश मिडीअम स्कूल, सोमेश्वर नगर, बारामती | इंग्रजी | १ ली |
| ८ | सरस्वती शिक्षण संस्था, देवतानगर, जळोची, बारामती, पुणे | सरस्वती विद्या मंदीर, जळोची, बारामती, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ९ | श्री.गणेश प्रतिष्ठान, मु.पो.मोरगाव, बारामती, पुणे | श्री.गणेश विद्यालय मोरगाव, बारामती, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १० | द हार्बर सोसायटी, शिक्षक नगर, घोरपडी | द हार्बर कम्युनीटी स्कूल, नसरापूर, ता.भोर | इंग्रजी | १ ली |
| ११ | कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | श्री.डोळसनाथ विद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १२ | राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, टाकवे बु, ता.मावळ, जि.पुणे | बाळराजे असवले इंग्लिश मेडिअम स्कूल, टाकवे बु. ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १३ | तळेगाव विद्या विकास प्रतिष्ठान, मनोहरनगर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | श्री.कृष्णराव भेगडे विद्यालय, मनोहरनगर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १४ | संकल्प शिक्षण प्रसारक मंडळ, पवनानगर, ता.मावळ, पुणे | संकल्प प्राथ इंग्लिश स्कूल, काले कॉलनी, मावळ, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १५ | एव्हरेस्ट एज्यू. सोसा. एव्हरेस्ट हाऊस, भुगाव, मुळशी, पुणे | एव्हरेस्ट लिटील पीपल स्कूल, भुगाव, मुळशी. पुणे | इंग्रजी | १ ली |
| १६ | सुंदराबाई साठे प्रतिष्ठान, एरंडवणे, कर्वेरोड, पुणे | श्री.विद्याभवन स्कूल, पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १७ | लिम्स एज्युकेशन सोसायटी | लिटल जिनीयस इंग्लिश मिडीअम स्कूल, आदर्श नगर हिंजवडी | इंग्रजी | १ ली |
| १८ | अहिल्या प्रतिष्ठान, मु.पो.पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री.मल्लिकार्जुन इंग्लिश मिडीअम स्कूल, मलठण | इंग्रजी | १ ली |
| १९ | स्व.पी.एस.आय. पद्माकर हरगुडे शिक्षण प्रसारक मंडळ, सणसवाडी, ता.शिरूर, जि.पुणे | जिजामाता इंग्लिश मेडिअम स्कूल, सणसवाडी, ता.शिरूर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| २० | श्री.गुरूदेव दत्त फाऊंडेशन, अप्पर इंदिरानगर, पुणे-२७ | ब्ल्यु स्काय इंग्लिश मेडिअम स्कुल, न्हावरे, ता.शिरूर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| २१ | जिजाऊ शैक्षणिक द्वारा श्री.सतिश नानाभाऊ वराटे साईराम, कर्वेनगर, पुणे | ज्ञानवर्धिनी विद्या मंदीर,,तळेगाव ढमढेरे | इंग्रजी | १ ली |
| २२ | श्री पिरॅमिड एज्यु. सोसा., मु.पो. महाळूंगे, ता.खेड, जि.पुणे | ज्ञानवर्धीनी इंग्लिश मिडीयम स्कूल, म्हाळुंगे, खेड | इंग्रजी | १ ली |
| २३ | खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, राजुगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे | न्यु इंग्लिश स्कूल, चाकण, खेड | इंग्रजी | १ ली |
| २४ | आनंद मेडिलक फाउंडेशन, मु.पो.करूळी, ता.खेड, पुणे | आनंद इंग्लिश मिडीअम स्कूल, कुरूळी | इंग्रजी | १ ली |
| २५ | ओम चैतन्य गगनगिरी एज्युकेशन इन्स्टिटयुट, मु.पो.मरकळ, खेड, पुणे | यु इंग्लिश स्कूल, मु.पो.मरकळ, खेड | इंग्रजी | १ ली |
| २६ | दत्तकला शिक्षण संस्थ, स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे | दत्तकला ईंटरनॅशनल स्कूल, स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| २७ | श्री.रेणुकादेवी सेवा प्रतिष्ठान, पारगाव, ता.दौंड | सौ.मुक्ताई बापूराव ताकवणे शिशू विद्या. , पारगाव, ता.दौंड | इंग्रजी | १ ली |
| २८ | भीमा शैक्षणिक न्यास, मधुकरनगर, पाटस, दौंड, पुणे | सुभाष आण्णा कुल प्राथ इंग्लिश कुल | इंग्रजी | १ ली |
| २९ | वरवंड ग्राम शिक्षण संस्था, वरवंड, ता.दौंड, जि.पुणे | कै.एकनाथ सिताराम दिवेकर इंग्लिश मिडीयम स्कूल, वरवंड, ता.दौंड | इंग्रजी | १ ली |
| ३० | भैरवनाथ शिक्षण मंडळ, खुटबाव, ता.दौंड, जि.पुणे | सानिया प्रायमरी इंग्लिश मेडिअम स्कूल, पारगाव, ता.दौंड | इंग्रजी | १ ली |

राज्यातील सह्याद्री मिडीयम इंग्लिश स्कूल, तळेगांव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे या खाजगी प्राथमिक शाळेस इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१९-२० या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१९/प्र.क्र. ३०/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: २८ फेब्रुवारी, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/ (२५८/ २०१३)/ प्राशि-३, दिनांक २/७/२०१३

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१८/वर्गवाढ/ड-५१२/२८८, दिनांक ३०/०१/२०१९

शासन निर्णयः-

राज्यातील सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगांव दाभाडे, ता. मावळ , जि. पुणे या खाजगी प्राथमिक शाळेस खालील विवरणात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | सहयाद्री इंग्लिश मिडीयम स्कूल, तळेगांव दाभाडे, ता. मावळ , जि. पुणे. | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१९-२० |

२. वरील शाळेस सन २०१९-२० या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. र. परमार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

२. मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे.
७. निवडनस्ती एसएम-५.

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगीबाबत
कै. पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान, तळेगाव दाभाडे, मा.मावळ, जि.पुणे संचलित सह्याद्री इंग्लिश स्कूल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.५८१/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांकः १६ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१९/प्र.क्र.५८१/एसएम-२, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९.

शासन शुद्धीपत्र:-

कै. पै. विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान, तळेगाव दाभाडे, मा.मावळ, जि.पुणे संचलित सह्याद्री इंग्लिश स्कूल, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे या शाळेस (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.६ वी ते १२ वी, इ. ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एसएफएस-१०१९/प्र.क्र.५८१/एसएम-२, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ अन्वये परवानगी देण्यात आली आहे. संदर्भाधीन शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.२.१ मध्ये "प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ " ऐवजी " उच्च प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक ते उच्च माध्यमिक, इ. ९ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ" असे वाचावे.

२. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा/ दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक ०५ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१६.०८.२०१९
(रा.वि.कुडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

SECRETARY
Sahyadri English Medium School
Talegaon Dabhade Pune 410506.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.५८१/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०५ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :- कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण, तळेगांव दाभाडे,ता.मावळ,जि.पुणे संचलित सहयाद्री इंग्लिश स्कुल,तळेगांव दाभाडे,ता.मावळ,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत कै.पै.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठाण, तळेगांव दाभाडे,ता.मावळ,जि.पुणे संचलित सहयाद्री इंग्लिश स्कुल,तळेगांव दाभाडे,ता.मावळ,जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) अशी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) सदर संस्थेने रुपये १५०००/- इतक्या रकमेचे अतिरिक्त चलन, किमान रुपये एक लक्ष इतक्या रकमेचे अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्र, रुपये ५ लक्ष इतक्या रकमेची तीन वर्ष मुदतीची मुदतठेव पावती, मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती,इयत्ता १ली ते ८ वी करीताचे अद्ययावत आरटीई नमुना -२ प्रमाणपत्र तसेच भौतिक सुविधाबाबतची पायाभूत प्रमाणकांची छायाचित्राच्या प्रती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने



Scanned with OKEN Scanner

शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे,
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे.



Scanned with OKEN Scanner